Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक २१]  गुरुवार ते बुधवार, जून २५-जुलै १, २०२६/आषाढ ४-१०, शके १९४८ [पृष्ठे ३ , किंमत : रुपये ११.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १३४.

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांजकडून**

**वाचावे**. १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन अधिनियम), १९६३ चे कलम ५ (२)

२. मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. पणन-५/कृउबास सावनेर/जागा खरेदी/१०७१/२०२६ दिनांक २३.०३.२०२६.

३. सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, सावनेर यांचे पत्र क्र. २४/२०२६ दिनांक ०८.०५.२०२६.

४. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सावनेर यांचे पत्र क्र. सनिसा/वि-१/कृउबास/रा.अधि./११८२/२०२६ दिनांक ०३.०६.२०२६.

**प्रारंभिक अधिसूचना**

क्रमांक-जिउनिना-पणन-कृउबास सावनेर-उपबाजार-प्रारंभिक अधिसूचना-६०६५-२०२६.—

**कृषि उत्पन्न बाजार समिती, सावनेर जि. नागपूर**

ज्याअर्थी, कृषि उत्पन्न बाजार समिती, ता. सावनेर जि. नागपूर यांनी श्री. किशोर नटवर सावल रा. सावनेर यांची मौजा नांदागोमुख येथील जमीन भूमापन क्र. ४७७/२ आराजी १.५४ हे. आर व भूमापन क्र. ४६७/१ आराजी १.४० हे. आर असे एकूण २.९४ हे. आर (७.२६ एकर) ही जागा मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे वाचावे पत्र क्र. २ अन्वये कृषि उत्पन्न बाजार समिती, सावनेरच्या उपबाजार नांदागोमुख गुरांच्या बाजाराकरीता खरेदी करण्यासाठी अटी व शर्तीस अधिन राहून मान्यता प्रदान करण्यात आली आहे. आणि-



ना.एक-अ-१ (१५७०).

ज्याअर्थी, तहसिलदार, सावनेर यांचे पत्र क्र./ के.जी.ओ./ तह. सावनेर/कावि-७९/२०२६ दिनांक ६ मार्च, २०२६ नुसार सावनेर तालुक्याच्या मौजा नांदागोमुख हद्दीत शासकीय गायरान जमीन नोंद दिसून येत नसल्याचे कळविले आहे. आणि-

ज्याअर्थी, कृषि उत्पन्न बाजार समिती, सावनेर जि. नागपूर तर्फे सभापती यांनी श्री. किशोर नटवर सावल रा. सावनेर यांचेशी केलेले उक्त नमुद शेतीचे विक्रीपत्र दिनांक ८ एप्रिल, २०२६ सादर केले आहे. आणि-

ज्याअर्थी,कृषि उत्पन्न बाजार समिती,सावनेर जि.नागपूर समितीच्या संचालक मंडळ सभा दिनांक २५ एप्रिल, २०२६ चे ठराव क्र. ६ नुसार, मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये मौजा नांदागोमुख येथे गुरांच्या बाजाराकरिता उपबाजार स्थापीत करण्यासाठी कृषि उत्पन्न बाजार समिती, सावनेर यांनी ठराव मंजूर केला आहे. या जागेवर शेतकऱ्यांकरीता गुरांचा बाजार, जनावरांसाठी सावलीकरीता झाडे व जनावरासाठी पिण्याच्या पाण्याकरीता हौद, अंतर्गत रस्त्यासह विद्युत व्यवस्था इत्यादी शेतकरी उपयोगी व हिताच्या पायाभुत सुविधा निर्माण झाल्यास त्याचा मोठा फायदा शेतकऱ्यास मिळेल. त्यामुळे गुरांची बाजारपेठ निर्माण झाल्यामुळे रोजगार दळणवळण वाढून ग्रामीण भागाच्या विकासालाही चालना मिळणार आहे. त्यामुळे मौजा - नांदागोमुख येथील जमीन भूमापन क्र. ४७७/२ आराजी १.५४ हे.आर. व भूमापन क्र. ४६७/१ आराजी १.४० हे. आर असे एकूण २.९४ हे.आर (७.२६ एकर) या जागेवर कृषि उत्पन्न बाजार समिती, सावनेरचे उपबाजार नांदागोमुख गुरांचा बाजार अधिसूचित करणेबाबत या कार्यालयास विनंती केली आहे. आणि-

ज्याअर्थी, प्रस्तावामध्ये सदर जमिनीचे विवरण व चतुःसिमा पुढील प्रमाणे-

| (अ) जमिनीचे विवरण | (ब) चतुः सिमा |
|---|---|
| मौजा - नांदागोमुख ता. सावनेर जि. नागपूर येथील जमीन भूमापन क्रमांक ४७७/२ आराजी १.५४ हे. आर. | **पुर्वेस** - नांदागोमुख – छत्रापूर रोड<br>**पश्चिमेस** – श्रीमती सरस्वती लालजी बोरकर व श्रीमती लिलाबाई घनश्याम ढुमणे यांचे मालकीचे शेत सर्वे क्र. ४७७/१<br>**उत्तरेस** – श्री. कांताराम महादेव भोयर यांचे मालकीचे शेत सर्वे क्र. ४७३<br>**दक्षिणेस** – खरेदीदाराने आज रोजी खरेदी केलेली शेत सर्वे क्र. ४६७/१ पैकी १.४० हे. आर. शेतजमीन |
| मौजा - नांदागोमुख ता. सावनेर जि. नागपूर येथील जमीन भूमापन क्रमांक ४६७/१ आराजी १.४० हे. आर. | **पुर्वेस** - श्रीमती सरस्वती लालजी बोरकर व श्रीमती लिलाबाई घनश्याम ढुमणे यांचे मालकीचे शेत सर्वे नं. ४७७/१ व खरेदीदाराने आज रोजी खरेदी केलेली शेत सर्वे क्र. ४७७/२ आराजी १.५४ हे. आर.<br>**पश्चिमेस** – सौ. नमिता मारोती चिकटे, सौ. वर्षा लिलाधर चिकटे व श्री. सचिन पुरुषोत्तम बोबडे यांचे मालकीचे शेत सर्वे क्र. ४६७/१ पैकी उर्वरीत आराजी<br>**उत्तरेस** - शेत सर्वे क्र. २८७, ४७१ व शेत सर्वे क्र. ४६८ चा काही भाग<br>**दक्षिणेस** – १६ फुट रुंदीचा वहीवाटीचा रस्ता नंतर शेत सर्वे क्र. ४७८ |

त्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ५ पोटकलम २ नुसार व शासन निर्णय दिनांक ५ सप्टेंबर, १९८१ अन्वये व मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. सीएमआर-आर-३५-ॲक्ट ॲड रुल्स

दिनांक १८ सप्टेंबर, १९८१ अन्वये निम्नस्वाक्षरीकारास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी, श्री. अजय भि. कडू, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, सावनेर ला उपबाजार नांदागोमुख गुरांच्या बाजाराकरीता उक्त नमूद केलेली मौजा- नांदागोमुख, येथील भूमापन क्र. ४७७/२ आराजी १.५४ हे.आर व भूमापन क्र. ४६७/१ आराजी १.४० हे. आर असे एकूण २.९४ हे.आर (७.२६ एकर) ही जागा ज्याची चतुःसिमा वर दर्शविलेली आहे. ही जागा उपबाजार नांदागोमुख गुरांचा बाजार म्हणून समजण्यात येईल, असा आपला इरादा या अधिसूचनेव्दारे जाहीर करीत आहे.

सदर्हु प्रारंभिक अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३५ दिवसांचे आत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर व कृषि उत्पन्न बाजार समिती, सावनेर यांचेकडे आपल्या कोणत्याही हरकती अगर सूचना ते विचारात घेतील.

सदरहू प्रारंभिक अधिसूचना आज दि. १२ जून, २०२६ रोजी माझे सही व शिक्यानिशी पारीत करीत आहे.

नागपूरः

दिनांक १२ जून, २०२६.

**अजय कडू,**

जिल्हा उपनिबंधक,

सहकारी संस्था, नागपूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.